MHOS070028282022

<u>नि.दि.मु.क्रं.६९७/२०२२ मधील निशाणी २९ वरील आदेश</u>

१. प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती साठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादींविरुध्द सरस - निरस मानाने वाटणी होऊन वादीस कायदेशीर हक्क हिस्सा अविभक्तपणे वाटून पृथ्थकपणे ताब्यात मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. दाव्याचा बारकाईने विचार केला असता, वादीच्या असे लक्षात आले की, दावा दाखल करताना दाव्यामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत. वादीने सदर दावा दाखल करतेवेळेस मौजे पेठसांगवी ता. उमरगा येथील जमीन गट क्र. २१४/२/२ क्षेत्र ०१-हे-६२-आर आकार ०६-रु-००-पैसे ही मालमत्ता वादीचे नावे कशी आली याबद्दल दाव्यात उल्लेख केलेला नसल्यामुळे सदर दाव्यातील कॉलम नं.५ नंतर ५-अ म्हणून खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

अ. परिच्छेद ५ झाल्यानंतर ५ अ मध्ये मजकूर, 'वादी व प्रतिवादी सदर दाव्यामध्ये वादीची मालमत्ता ही जमीन मौजे पेठसांगवी ता. उमरगा येथील गट क्र. २१४/२/२ क्षेत्र ०१-हे-६२-आर आकार ०६-रु-००-पैसे ही मालमत्ता वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत होती परंतू वादीच्या आईच्या आईने म्हणजेच नामे सौ. नंदाबाई मोतीसिंग दुबे हिने वादी क्र.१ धिरज हा अज्ञान असताना त्याच्या नावे वादीचे आजोबा म्हणजेच वादीच्या वडीलाचे वडील (आजोबा) नामे किसनसिंग मोतीसिंग चव्हाण यांच्याकडून वादीच्या आईची आई (आजी) यांनी सदरची मिळकत दिनांक १२.०१.२०१० रोजी खरेदीखत दस्त क्र. ७७/२०१० अन्वये खरेदी घेतलेली आहे

व वादीचे वडीलाचे वडील यांचेपण नाव मोतीसिंग चव्हाण होते व वादीच्या आईच्या वडीलांचे नाव पण मोतीसिंग दुबे असे आहे.' सदरची मिळकत ही वंशावळीप्रमाणे वादीच्या वडीलांकडील आजोबांनी वादीच्या आईकडील आजीस सदरची मिळकत खरेदीखतान्वये दिली होती. आईकडील आजी व आजोबास मुलगा नसल्यामुळे त्यांना वादीची आई ही एकमेव वारस होती म्हणून सदर जमिनीचा खरेदीखताचा संपुर्ण मोबदला देऊन सदरचे खरेदीखत वादीच्या नावे अज्ञान असताना केलेले आहे. म्हणून सदरची मिळकत ही स्त्रीधन मिळकत असल्यामुळे सदर दाव्यात वादीने सदर मिळकतीचे उल्लेख केलेले नव्हते' अशी दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

३. या कामी प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.३४ वर दिले असून त्यांनी असे कथन केले की, नमुद दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. वादी हे त्यांची चुक दुर करण्याचा प्रयत्न करीत आहे. तात्पुरत्या मनाई हुकूम चा अर्ज नामंजूर झाल्याने वादी या अर्जाद्वारे नवीन कथन करण्याचा प्रयत्न करत आहे. नमुद दुरुस्ती अस्पष्ट, असंदिग्ध आहे आणि तो मंजूर केला तर मोठी गुंतागुंत निर्माण होणार आहे. सदरील अर्जामुळे मुळदावा बदलणार आहे त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांचा विचार करता खालील मुद्दे या अर्जाच्या निकालासाठी उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देण्यात आले.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी मागणी केलेल्या अर्जानुसार दुरुस्ती करू शकतो काय ? | ... | होय. |
| २. | आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

<u>मुद्दा नं. १ चे संदर्भात -</u>

५. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील वादीचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदर परिस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की वादीने प्रतिवादी विरूध्द सदरचा दावा सरस निरस मानाने वाटणी होवून वादीस त्याचा कायदेशीर हक्क हिस्सा अविभक्तपणे ताब्यात मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केला आहे.

६. कायद्याच्या प्रस्थापित तत्वानूसार दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरूस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणाचा विचार करणे अपेक्षित नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा मुळ हेतू असा आहे की वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मुळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थिती अभिलेखावर आणून योग्य व न्याय करणे आवश्यक आहे. वादीने अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्तीचा विचार करता वादीने असे नमुद केले आहे की, वादीने सदरची मिळकत ही स्त्रीधन मिळकत आहे असे समजून सदरची मिळकत दाव्याकामी समाविष्ट केलेली नाही परंतू या दाव्याकामी वाटणीबाबत विचारविनिमय होवून दाव्याचा गुणदोषावर अंतिम व योग्य तो निर्णय होण्यासाठी वादी व प्रतिवादी यांच्याशी निगडीत सर्व मिळकतींचा या दाव्याकामी समावेश होवून त्यांच्या हक्क व अधिकारावर ऊहापोह होणे जरुरीचे आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार सदरची दुरुस्ती ही वादी नि.५ च्या नामंजूरीनंतर दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होण्याचे उद्देशाने केले आहे. परंतू या दाव्याकामी वादी अथवा प्रतिवादी या दोघांच्याही हक्कांच्या अनुषंगाने एखादी मिळकत समाविष्ट करणे अथवा कौटूंबिक माहितीबाबत संपूर्ण उलगडा करणे त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नसून त्यामुळे वादी व प्रतिवादी तसेच दावा मिळकतीशी निगडीत सर्व पक्षकारांचे गुणदोषावर हक्क निर्णयित होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अभिलेखावरील वस्तुस्थिती विचारात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य आहे असे मला वाटते. म्हणून वरील सर्व गोष्टींचा विचार करता मी या तथ्य विषयक

आणि विधिविषयक निर्णयाप्रत आलेले आहे की, न्यायाच्या दृष्टीने सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी लिहून मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती दाव्यामध्ये पुढील १४ दिवसात करावी.

स्वाक्षरीत/-
(गीता प्र. बनकर)
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,उमरगा

उमरगा
दिनांक – २२.०१.२०२४

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. D. B. Nikam |
| Court | --- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Omerga |
| Date | --- | 22-01-2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 22-01-2024 |
| Order uploaded on | --- | 23-01-2024 |